क्र.धाखनि/पुरवठा/कक्ष-4/कावी- 28/2019
जिल्हाधिकारी गोंदीया यांचे कार्यालय, गोंदीया,
दिनांक- 11 जुलै,2019.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती
जाहीरात सुचना

ग्राहक संरक्षण अधिनियम 1986 मध्ये ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद स्थापण करण्यासाठी खालील प्रमाणे अशासकीय सदस्यांची संख्या व प्रवर्ग निश्चित करण्यात येत असुन शासन निर्णय क्रमांक ग्राराप/1013/प्र.क्र.119/ग्रा.स.-2, दिनांक 19.10.2013 मध्ये पात्रतेचे निकष देण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असुन त्याचा सांकेतांक 201310191602526306 असा आहे.

गोंदीया जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर प्रवर्गनिहाय अशासकीय सदस्यांची नियुक्ती करावयाची असल्याने गोंदीया जिल्हयातील ईच्छुक संस्थाचे प्रतिनीधी व व्यक्ती यांचेकडुन अर्ज मागविण्यात येत आहे. प्रवर्गनिहाय अशासकीय सदस्यांचे नियुक्ती अर्ज दिनांक 20 ऑगस्ट 2019 पर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालयात (कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळता) शासनाने विहीत केलेल्या परिशिष्ट अ व ब प्रमाणे नमुद केलेल्या मुळ कागदपत्रांच्या सांक्षांकीत प्रतिसह सादर करावे. सांक्षांकीत हे केंद्र व राज्य शासनाच्या राजपत्रीत अधिकारी यांचे असावे. साक्षांकीत प्रति जोडल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

नियुक्त करावयाच्या अशासकीय सदस्यांच्या रिक्त पदांचा तपशिल

| अ.क. | प्रवर्ग | नियुक्त करावयाच्या अशासकीय सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| 1 | नगरपरिषद सदस्य | 2 पदे (1 पद महीला राखीव) |
| 2 | कृषी उत्पन्न बाजार समिती | 2 पदे (1 पद महीला राखीव) |
| 3 | ग्राहक संघटनेचे प्रतिनीधी | 9 पदे (2 पदे महीला राखीव) |
| 4 | व्यापार व उद्योग क्षेत्राचे प्रतिनीधी | 2 पदे |
| 5 | पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे प्रतिनीधी (प्रत्येकी एक) | 2 पदे |
| 6 | शेतकऱ्यांचे प्रतिनीधी | 2 पदे |
| 7 | शाळा व महाविद्यालयाचे प्रतिनीधी | 1 पद |
| 8 | पंचायत समितीचे प्रतिनीधी | 1 पद (महीला राखीव) |

सर्व माहीती, अर्जाचा नमुना व शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. दिनांक 20 ऑगस्ट 2019 नंतर प्राप्त होणारे व अपुर्ण अर्ज स्विकारण्यात येणार नाही, याबाबत नोंद घ्यावी.

16/7/19
(डॉ.कादम्बरी बलकवडे)
जिल्हाधिकारी, गोंदीया